# महाराष्ट्र मेट्रो रेल कॉर्पोरेशन लिमिटेड

# (नागपूर मेट्रो रेल प्रकल्प )

## वृक्षारोपण करत नागपूर मेट्रोने साजरा केला पर्यावरण दिन



नागपूर: ५ जून रोजी जागतिक पर्यावरण दिनाच्या निमित्ताने देशात सर्वत्र कार्यक्रम साजरे होत असताना, नागपूर मेट्रोने देखील या संबंधाने विविध उपक्रम राबवलेत. ग्रीन मेट्रो अशी ओळख असलेल्या नागपूर मेट्रोने आज शहरातील लिटील वूड येथे वृक्षारोपण केले. तसेच सर्व सामान्य जनतेला पर्यावरण दिनाचा संदेश दिला.

पर्यावरण रक्षणाकरता कायम तत्पर असलेल्या नागपूर मेट्रोने शहरातील लिटील वूड येथील अर्बन फॉरेस्ट येथे वृक्षारोपण केले. वड,पिंपळ,करंज, कडुलिंब,चिंच आणि अर्जुन झाडं लावत लिटील वूडला अधिक अधिक हिरवेगार करण्याचा प्रयत्न केला. यावेळी व्यवस्थापकीय संचालक,महा मेट्रो श्री. श्रावण हर्डीकर यांनी वृक्षारोपण करत झाडांचे चांगल्या प्रकारे संगोपन करण्यात यावर भर देत या परिसरात आणखी झाडे लावण्यात यावी या संबंधीच्या सूचना

दिल्या. मेट्रो अधिकारी श्री दिलीप मलैया यांच्या ६ वर्षाची मुलगी कुमारी अनिका हिने झाड लावत या वृक्षारोपण कार्यक्रमाची सुरुवात केली. यावेळी, संचालक(रोलिंग स्टॉक व सिस्टीम) श्री. विनोद कुमार अग्रवाल, संचालक(वित्त) श्री. हरेंद्र पांडे, संचालक (प्रकल्प) श्री राजीव त्यागी आणि इतर वरिष्ठ अधिकारी या कार्यकमात सहभागी झाले होते.

महा मेट्रोने हिंगणा मार्ग लिटिल वुड या पार्कमुळे एक आकर्षक पर्यटन स्थळ महा मेट्रोने तयार केला आहे.शहराच्या सर्वांगीण विकासात नागरिकांचे स्वास्थ्य चांगले राखण्यास पर्यावरणाची महत्वाची भूमिका असते. त्यामुळे मेट्रो प्रकल्प राबवित असताना सुरवातीपासूनच पर्यावरण संवर्धन प्राधान्य महा मेट्रो द्वारे देण्यात आले आहे. उल्लखेखनीय आहे कि, महा मेट्रोने नागपूर मेट्रो रेल प्रकल्प फ़ेज - १ अंतर्गत १४५०० झाडे लावलीत आणि फ़ेज - २ अंतर्गत आतापर्यंत २१८८ झाडे लावण्यात आली असून बुटीबोरी येथे १५००० झाडे लावण्यात येणार आहे तसेच सीआरएफ प्रकल्पा अंतर्गत ३१३९ झाडे देखील लावण्यात आली  आहे.

